लोकांचे दैनिक
लोकशाही वार्ता
07 Jan 2025 - Page 2

# अभ्यासात सातत्य ठेवून उत्तम करिअर घडवा - सुकेशनी तेलगोटे

## सावित्रीबाईंना आदरांजली, बार्टीच्या महिला हक्क जाणीव जागृती पर्वाचे उद्घाटन

**लोकशाही वार्ता/नागपूर**

नियमित अभ्यास करून उत्तम करिअर घडवा आणि देशाची व समाजाची सेवा करा. सावित्रीबाईला हिच खरी आदरांजली ठरेल असे मत सहाय्यक उपायुक्त सुकेशनी तेलगोटे यांनी व्यक्त केले. त्या बार्टीच्या महिला जाणीव जागृती पर्वाच्या उद्घाटन सत्रात त्या बोलत होत्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी अंतर्गत बार्टी प्रादेशिक कार्यालय नागपूर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले जयंती ते १२ जानेवारी राजमाता जिजाऊ जयंती दरम्यान या स्फूर्तिदायी महिलांच्या स्मरणार्थ महिला हक्क जाणीव जागृती पर्वाचे आयोजन केल्या गेले आहे. हे या पर्वाचे दुसरे वर्ष आहे. या पर्वाच्या पहिल्या सत्राचे उद्घाटन ३ जानेवारी रोजी शासकीय मुलींचे वसतिगृह बेसा येथे करण्यात आले. सावित्रीबाईनी जशी आपली लढाई स्वतः लढली तशी तुम्हा सर्वांना स्वतःची लढाई स्वतः लढायची आहे. या वयातील मैत्री, प्रेम फसवे असते. त्यामुळे त्या मागे न लागता आपल्या अभ्यासाकडे, करिअरकडे लक्ष केंद्रीत करा असा सल्ला सुकेशनी तेलगोटे यांनी विद्यार्थिनींना दिला. सावित्रीबाई फुले, राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस माल्यार्पन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सलमान शेख यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. शीतल गडलिंग यांनी विद्यार्थिनींना संविधानाच्या उद्देशिकेचा अर्थ समजावून सांगितल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनिता झाडे यांनी केले. नागेश वाहुरवाघ यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी व्यासपीठावर साहाय्यक आयुक्त सुकेशनी तेलगोटे, विशेष अतिथी पोलिस उपनिरीक्षक मिना उमाळे, ॲड. सुरेखा बोरकुटे, सा. प्रकल्प व्यवस्थापक अनिल वाळके, कल्पना पाटील उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते शासकीय वसतिगृहातील जीमचे उद्घाटन करण्यात आले. बेसा येथील पोलिस उपनिरीक्षक मिना उमाळे यांनी उपस्थित विद्यार्थिनींना आपल्या सुरक्षिततेच्या संदर्भात माहिती दिली. आपल्या अवती भवतीच्या मिसगाईड करणाऱ्या लोकांपासून सावध राहण्याचा सल्ला दिला तसेच काही अनुचित प्रकार घडल्यास ११२ या हेल्प लाईनवर फोन करण्यास सांगितले. बार्टीचे सा. प्रकल्प व्यवस्थापक अनिल वाळके यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. तसेच बार्टीमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन जानव्ही ढोले तर आभार सायली खोब्रागडे या विद्यार्थिनीने मानले. यावेळी मोठ्या संख्येनी वसतिगृहातील विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



### व्यसन आणि कुसंगत ही गुन्ह्याची सुरुवात

व्यसन आणि कुसंगत ही गुन्हाची सुरुवात असते. त्यापासून सावध राहण्याचा सल्ला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या ॲड. सुरेखा बोरकुटे यांनी विद्यार्थिनींना दिला. पॉर्न साईट, सायबर क्राईम, डिजिटल अरेस्टपासून बचावा संदर्भातही त्यांनी माहिती दिली.